


ISSN 2394-5303


श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा द्वारा संचालित

**श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

देऊळगाव राजा, जि.बुलढाणा (महा.) पिन-४४३२०४

नॅक पुनर्मूल्यांकन 'ब++' दर्जा प्राप्त



आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका (TM)

प्रिंटिंग एरिया

विशेषांक, डिसेंबर-२०१७


# भारतीय कृषिक्षेत्रासमोरील आव्हाने व संधी

IMPACT FACTOR 4.002 iijif


संपादक

प्रा.ज्ञानेश्वर विष्णू गोरे




53) महाराष्ट्रातील शेती व्यवसायात महिलांचे योगदान
प्रा.डॉ.निलम एम. छंगाणी, जि. वाशिम ||164

54) स्वामीनाथन आयोग आणि कृषी विकास
प्रा. पांडुरंग हुडेकर, बुलडाणा ||167

55) भारतीय शेतक–यांच्या आत्महत्या – एक ज्वलंत समस्या
प्रा.डॉ.भिमराव प्र. उबाळे, जि.बुलडाणा. ||169

56) भंडारा व गोंदिया जिल्हयातील भात उत्पादकांद्वारे शेती विषयक सल्ला ...
प्रा. सुनिल नामदेवराव ईश्वार, जिल्हा यवतमाळ. ||171

57) ब्रिटीशकालीन भारतीय कृषी संशोधन व अध्ययनाची कार्ये –एक अभ्यास
प्रविण सुरेशराव शिंगणे & डॉ.कल्याणकर पी.एम. फुलंब्री. ||175

58) शेतकऱ्यांच्या आत्महत्या : शोध आणि बोध
आकाशनाथ दत्तात्रय बोरकर, औरंगाबाद. ||179

59) भारतीय कृषीक्षेत्रासमोरील आव्हाने व संधी
प्रा. ज्ञानेश्वर विष्णु गोरे, देऊळगाव राजा, जि. बुलडाणा. ||181

International Multilingual Research Journal

Printing Area

9850203295 Area 7588057695

Editor Dr.Bapu G.Gholap

भारत लाखों गावांचा देश आहे. आणि अधिकांश जनता कृषी व्यवसायाशी जुडलेली आहे. असे असले तरी अनेक वर्षापर्यंत येथील कृशीशी संबंधीत जनता भुखमारीत आलेले जिवन जगत आलेली आहे. भारतासंबंधी हा ग्रह झालेला होता की कृषीशी जोडलेली अर्थव्यवस्था असुनही भारता सारख्या देशात भुखमारीसारखी समस्या सोडवणे कठीण आहे. याचे कारणच हे होते. की परंपरागत काळापासून भारताता जुने परंपरागत तंत्रज्ञान, बि बियाने यांचा प्रयोग होत आलेला आहे त्यात सुधारणा करण्याकडे कुणी लक्षच केंद्रीत केले नव्हते अशावेळी एम.एस.स्वामीनाथनच ने पहिले व्यक्ती होते. ज्यांनी सर्वात अगादर गव्हाच्या एक उत्तम प्रकाराला ओळखले आणि स्विकारले. यातुन भारताच्या अन्नाच्या बाबतीत आत्मनिर्भर बनवले जावू शकले.

संदर्भ:—


१. शेती व्यवसायातील मंदी आणि संधी — प्रा. डॉ. मुकुंदराव गायकवाड .

२. प्रभाव लेख, बदलते वारे — विलास पंढरी .

३. दै. लोकसत्ता, २२ फेब्रु २०१६ .

४. बिगुल दि. २८ एप्रिल २०१७ .

५. राष्ट्रीय शेतकरी आयोग (द्वितीय अहवाल)

६. शेतकऱ्यांसाठी महत्वाचा ''स्वामीनाथन आयोग'' चेतन जोशी लेख, ६ जून २०१७

७. जनसत्ता— किसान आयोग जरूर करो, अधवेश कुमार, १८ डिसें. २०१५ .


❑❑❑

**55**

# भारतीय शेतक—यांच्या आत्महत्या — एक ज्वलंत समस्या


प्रा.डॉ.भिमराव प्र. उबाळे,

समाजशास्त्र विभाग,

संत भगवान बाबा कला महाविद्यालय

सिंदखेड राजा, जि.बुलडाणा.


***********

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतात एकून लोकसंख्येच्या ७० ते ७५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. भारतीय अर्थव्यवस्था देखिल कृषीवर आधारीत आहे. एकूनच शेती हा भारतीय जिवनाचा कणा आहे. आपल्या निढळाच्या घामाने शेती पिकविणारा शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. तुमच्या आमच्या पोटाची भूक भागविणारा म्हणजे शेतकरी. अगदी प्राचिन काळापासून पिढ्यांन पिढ्या शेती करणारा, शेतीत राबणारा शेतकरी,शेतीला भुमाता मानणारा शेतकरी आज चिंताग्रस्त, गरीब, शेती विषयी अनास्था व प्रसंगी या शेतीमुळेच आत्महत्या करणारा शेतकरी म्हणून सर्वांना ज्ञात बनला आहे. दिवसेंदिवस आत्महत्या करणा—या शेतक—यांचे प्रमाण वाढत आहे. जमिनीतून मोती पिकविणारा, शेतातील पिकावर प्रेम करणारा, आपल्या गुरांवर जिवापाड प्रेम करणारा, रात्रंदिवस कशाची ही भिती न बाळगणारा, निडर, धाडशी, कष्टाळु, जिद्दी असा शेतकरी आधुनिक काळात का हतबल बनला? गरीब का बनत आहे? सर्वात महत्वाचे म्हणजे आत्मघात, आत्मनाश, आत्महत्त्या का करत आहे? या प्रश्नावर सर्वांनी चिंतन करणे आज आवश्यक आहे. शेतकरी संपला, शेतिवरचा शेतक—याचा विश्वास उडाला तर भारतालाच नव्हे तर जगाला अन्ना वाचून मरावे लागेल. कुठल्याही भौतिक प्रगतीसाठी अन्न उत्पादन करणारा शेतकरी ताठ मानेने, सन्मानाने उभा राहणे, तो जगणे आवश्यक आहे.

शेतक—याच्या स्थितीचा सुक्ष्मपणे अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, आपल्या बायको, मुलासह स्वत: शेती करणारा, प्रसंगी शेतमजुर लावून शेती काम करुन घेणा—या शेतक—याचे दैनंदिन उत्पन्न किती आहे? तर ते शुन्य म्हणावे लागेल. कारण कोणतेही पिक पेरल्या नंतर जो पर्यंत ते पिक बाजारपेठेत जात नाही तो पर्यंत शेतक—याच्या हातात पैसा येत नाही. रोज तो कितीही शेतात राबला तरी त्या दिवसाची त्याची मजुरी किती हा संशोधनाचा विषय आहे. नोकरदाराला महिण्याला पगार मिळतो, मजुराला दैनिक किंवा आठवड्याला मजुरी मिळते परंतु हा नियम जगाच्या पोशिंद्यासाठी लागू नाही.

शेतक—यांच्या आत्महत्तेचे सत्र ब—याच दिवसापासून सुरु आहे. परंतु १९९० मध्ये प्रसिध्द इंग्रजी वर्तमानपत्र ''द हिंदू'' मध्ये सर्वप्रथम पी.साईनाथन यांनी शेतक—यांच्या आत्महत्ते संदर्भात माहिति प्रकाशित केली. त्यानंतर सर्व भारतातून शेतकरी आत्महत्ते संदर्भात वर्तमानपत्रात बातम्या येणे सुरु झाले. सुरुवातीस आत्महत्त्या करणारा शेतकरी हा महाराष्ट्रातील कापुस उत्पादक शेतकरीच फक्त आत्महत्त्या करतो हा गैरसमज सर्वांचा होता. परंतु कापसासह अन्य नगदी पिके घेणा—या शेतक—यांचे आत्महत्त्येचे शेकडा प्रमाण खुप जास्त आहे. यामध्ये फक्त गरीबच नाही तर सर्व स्थरातील शेतक—यांचे आत्महत्तेचे प्रमाण ब—याच मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसून येते.

१९०९ मध्ये भारतात १७३६८ शेतक—यांनी आत्महत्त्या केल्या. सर्वात जास्त आत्महत्त्या महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड मध्ये झाल्या आहेत. या पाच राज्यामध्ये १०७६५ म्हणजेच ६२ टक्के आत्महत्त्यांची नोंद झालेली आहे. १९९१ ते २००१ च्या जनगणनेच्या तुलनात्मक आकडेवारी नुसार असे स्पष्ट होते की, देशातील शेतक—यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. २००१ च्या जणगणनेनुसार मागील १० वर्षात ७० लाख शेतक—यांनी शेती करणे बंद केले आहे. २०११ च्या आकडेवारी नुसार महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या पाच राज्यामध्ये १५३४ शेतक—यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. अ... देशामध्ये प्रत्येक महिण्याला ७० पेक्षा जास्त ... आत्महत्त्या करतात. महाराष्ट्रातील आजपर्यंत... शेतकरी आत्महत्तेचा आकडा ५० हजारापेक्षा ... आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्त्या हि देशासमोर... ज्वलंत समस्या बनली आहे.

महाराष्ट्रातील शेतक—यांच्या वर्षनिहाय आत्महत्त्या...

| अ.क्र. | वर्ष | शेतकरी आत्महत्तेची संख्या |
|---|---|---|
| १ | २००७ | ४२३८ |
| २ | २००८ | ३८०२ |
| ३ | २००९ | २८७२ |
| ४ | २०१० | ३१४१ |
| ५ | २०११ | ३३३७ |
| ६ | २०१२ | ३७८६ |
| ७ | २०१३ | ३१४६ |
| ८ | २०१४ | ४००४ |
| ९ | २०१५ | ४२९१ |

अशा प्रकारे महाराष्ट्रासह देशातील शेतकरी आत्महत्त्यांचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. शासनासह, स्वयंसेवी संस्था आणि प्रत्येकाने स्वत:स जसे शक्य होईल तसे या आत्महत्तेच्या संदर्भात संशोधन, अभ्यास करुन या समस्येवर उपाययोजना करणे देशाच्या भविष्य काळासाठी अत्यंत आवश्यक ठरणार आहे. त्यापैकी काही उपाययोजना.

१. शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व कमी करणे.

२. शेतीसाठी बारामाही पाणी पुरवठ्याची सोय करणे.

३. शेतीसह पूर्ण वेळ विज उपलब्ध करुन देणे.

४. शेती मालाला हमी भाव देणे.

५. शेती कर्जासाठी कमीत कमी व्याजदरात बॅंक कर्ज देणे.

६. गावठी सावकारांच्या दडपशाहीवर बंधने घालणे.

७. शेती पुरक व्यवसायासाठी दिर्घ मुदतीची कर्ज देणे.

८. खते, किटक नाशके, बि बियाणे यांच्या किंमती नियंत्रणात ठेवणे.